**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार, दिनांक २७ एप्रिल २०२४**

**ठळक बातम्या**

1. **सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांसाठी आता प्रचाराला आणखी वेग / प्रधानमंत्री आणि भाजप नेते नरेंद्र मोदी यांची आज कोल्हापुरात सभा तर काँग्रेस महासचिव प्रियांका गांधी यांची उद्गीर मधे सभा.**
2. **निवडणूक आयोगातर्फे नॅशनल ग्रीव्हन्स सर्व्हिस पोर्टल - एन जी एस पी कार्यान्वित.**
3. **राष्ट्रीय बीज महोत्सवाला नागपूरच्या वनामती इथं सुरुवात, २९ एप्रिल पर्यंत राहणार खुला.**

**आणि**

4. **बुलडाणा जिल्ह्यात करोली घाट इथं बस अपघातात २८ प्रवासी जखमी.**

*****

पंतप्रधान- कोल्हापूर / प्रियंका गांधी सभा

सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांसाठी आता प्रचाराला आणखी वेग आला आहे. प्रमुख राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते प्रचार सभांसाठी संपूर्ण देश पिंजून काढत आहेत. प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांची आज कोल्हापुरात सभा होत आहे. सभास्थळी त्यांचे आगमन झाले आहे. महायुतीचे कोल्हापूर मतदारसंघातले उमेदवार संजय मंडलिक आणि हातकणंगले मतदारसंघातले उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचारासाठी ही सभा आयोजित करण्यात आली आहे. दरम्यान, महाविकास आघाडीकडून शाहू महाराज छत्रपती यांना उमेवारी देण्यात आली आहे. काँग्रेसच्या महासचिव प्रियंका गांधी आज

लातूर जिल्ह्यात उद्गीर इथं महाविकास आघाडीचे उमेदवार शिवाजी काळगे यांच्या प्रचारासाठी त्यांनी सभा घेतली. आज देशवासी महागाईने ग्रासले आहे महाराष्टातील शेतकरी आत्महत्या रोकण्यात या सरकारला यश आले नाही. अशी टीका प्रियांका गांधी यांनी आपल्या भाषणातून केली. पुढील पाचवर्षात जीवनात सुधारणा करायची असेल तर विचारं पूर्वक मतदान करण्याचे आवाहनही प्रियंका गांधी यांनी या वेळी केले. या सरकार मध्ये ३० लाख नोकऱ्या बाकी आहेत त्या आमचे सरकार भरणार असल्याचे आश्वासनही त्यांनी दिले कर्नाटक, तेलगांना येथे आम्ही दिलेली आश्वास पूर्ण करीत आहोत शेतकरी कर्जमाफी आम्ही कर्नाटक मध्ये केली असे गांधी यांनी सांगितले. दरम्यान, लातूरमधून भाजपचे उमेदवार सुधाकर श्रागारे उभे आहेत.

मतदान टक्केवारी

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात काल सायंकाळी ७ वाजेपर्यंत सरासरी ६० पूर्णांक ९६ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली. उष्णतेची लाट असतानाही विविध वर्गातील नागरिकांनी उत्साहानं मतदान केल्याचं चित्र अनेक मतदान केंद्रांवर पहायला मिळालं. महाराष्ट्रात ६ वाजेपर्यंत अंदाजे सरासरी ५९ पूर्णांक ६३ शतांश टक्के मतदान झालं असल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे. सर्वाधिक ५६ पूर्णांक ६६ शतांश टक्के मतदान वर्ध्यात झालं. सर्वात कमी ५२ टक्के मतदानाची नोंद हिंगोलीत झाली. यवतमाळ-वाशिम, परभणी, अमरावती मध्ये सुमारे ५४ टक्के तर अकोला, बुलडाणा आणि नांदेडमध्ये ५२ टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झालं. एकूण २०४ उमेदवारांचं भवितव्य मतदारांनी यंत्रात नोंदवलं.

चौथा टप्पा

राज्यातील लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 च्या चौथ्या टप्प्यातील मतदान 13 मे 2024 रोजी होणार आहे. यासाठी राज्यातील 11 लोकसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत एकूण 447 उमेदवारांचे 618 अर्ज दाखल झाले होते. या अर्जांची छाननी केल्यानंतर एकूण 369 उमेदवारांचे अर्ज वैध ठरले असल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे. चौथ्या टप्प्यातील उमेदवारी अर्जांची छाननी केल्यानंतर नंदुरबार लोकसभा मतदारसंघात 16, जळगाव-20, रावेर-29, जालना-35, औरंगाबाद-44, मावळ-35, पुणे-42, शिरूर-35, अहमदनगर-36, शिर्डी-22 आणि बीड लोकसभा मतदारसंघात 55 असे एकूण 369 उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत.

उत्तर मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघ

भारतीय जनता पक्षाने उत्तर मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून जेष्ठ विधीज्ञ उज्जवल निकम यांना उमेदवारी दिली आहे. या मतदार संघाच्या विद्यमान खासदार पूनम महाजन यांना उमेदवारी नाकारण्यात आली आहे. या मतदार संघातुन कालच कांग्रेसने माजी मंत्री  एडवोकेट वर्षा गायकवाड यांना उम्मीदवारी दिली आहे.

नॅशनल ग्रीव्हन्स सर्व्हिस पोर्टल

निवडणूक आयोगानं नागरिकांना हवी असलेली माहिती मिळवणं आणि तक्रारी नोंदवण्यासाठी नॅशनल ग्रीव्हन्स सर्व्हिस पोर्टल - एन जी एस पी कार्यान्वित केलं आहे. या पोर्टलवर आलेल्या कॉल्सना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. निवडणूक ओळखपत्र, मतदार केंद्र, मतदानासाठी आवश्यक ओळखपत्रं आदींविषयक माहिती या पोर्टलवर नागरिकांमार्फत विचारण्यात येते. आतापर्यंत अशा ८ हजाराहून अधिक कॉल्सना या पोर्टलच्या माध्यमातून उत्तर देण्यात येऊन या नागरिकांचं शंका समाधान करण्यात आलं आहे. या पोर्टलवर दाखल झालेल्या सर्व

तक्रारींपैकी सुमारे ७५ टक्क्यांहून अधिक तक्रारी या मतदार ओळखपत्राशी संबंधित असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

बीज उत्सव

मानवी जगण्याचा आधार असणारे पाणी, हवा आणि माती हे घटक शुद्ध आणि शाश्वत ठेवण्यासाठी समाज आणि कृषीक्षेत्राच्या परस्पर समन्वयातून महाबिजोत्सव व्हावा, अशा भावना प्रगतीशिल शेतकरी सुभाष शर्मा यांनी आज नागपुरात  व्यक्त केल्या. वसंतराव नाईक कृषी विस्तार व्यवस्थापन शिक्षण संस्थेच्या (वनामती) वसंतराव नाईक स्मृती सभागृहात आयोजित राष्ट्रीय बिजोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षीय भाषणात . शर्मा यांनी हे विचार मांडले. शेतकरी, स्वयंसेवी संस्था, संशोधक, सरकारी तसेच शैक्षणिक संस्था यांच्यात समन्वय वाढवून येणाऱ्या पिढ्यांसाठी आणि  पर्यावरणाला अनुकूल सुरक्षित पोषक अन्न उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने 27 ते 29 एप्रिल 2024 या कालावधीत राष्ट्रीय बीज महोत्सवाचे आयोजन  करण्यात आले आहे. यात परंपरागत बियाण्यांचे प्रदर्शन, सेंद्रिय व नैसर्गिक शेतमाल प्रदर्शन व विक्री, भरडधान्य पाककृती कार्यशाळा आणि पर्यावरण संतुलन विषयावर चित्रकला स्पर्धा आदी उपक्रम होत आहेत. मध्यप्रदेश, छत्तीसगड, कर्नाटक, पश्चिम बंगाल, आंध्रपदेश, तामिलनाडू आदी 18 राज्यातील बीज उत्पादक शेतकरी या महोत्सवात सहभागी झाले आहेत. या महोत्सवात सुरक्षित पोषक अन्न, शाश्वत शेतीचे तंत्र आणि देशी बियाणांच्या जातींचे जतन व प्रसार करण्यासाठी शेतकऱ्यांना मंच उपलब्ध करुन देण्यात आला आहे. २९ एप्रिल पर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात तीनही दिवशी, शेतकऱ्यांसाठी विविध विषयांवर कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे.

बस अपघात

बुलडाणा जिल्ह्यात जळगाव जामोद बुरहानपुर महामार्गावर करोली घाट इथं एका प्रवासी बसचं नियंत्रण सुटल्यानं ही बस १०० फूट खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात बसमधले २८ प्रवासी जखमी झाले. सर्व जखमींना उपचारासाठी मध्यप्रदेशात दरियापूर आणि बुरहानपूरच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. रायल्स ट्रावेल्सची ही बस मध्य प्रदेशच्या इंदोर इथून अकोला इथं चालली होती अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

अपघात

लग्नसोहळा आटोपून स्वगावी परत येत असतांना भरधाव चारचाकी वाहनाच्या चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने अपघात झाल्याची घटना भंडारा जिल्ह्यातील साकोली इथं  मध्यरात्रीच्या सुमारास घडली. या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू तर तिघे जण गंभीर जखमी झाले.जखमीनवर उपचार सुरू आहे.

धाडसत्र मोहीम

अवैध धंद्यांवर आळा घालण्याच्या दृष्टिने काही महिन्यांपासून भंडारा पोलीस विभागाकडून अवैध धंद्यांवर धाडसत्र मोहीम राबविली जात आहे. तुमसर उपविभागीय पोलीस विभागाने गोबरवाही हद्दीत हातभट्टीवर धाड घालून ४ लाख ५३ हजारांचा मुद्देमाल नष्ट केला. उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या कारवाईमुळे अवैध व्यवसायिकांवर वचक बसला आहे.

हवामान

विदर्भात आज सर्वाधिक कमाल तापमान चंद्रपूर इथं ४३ पूर्णांक ६ अंश सेल्सियस इतका नोंदविण्यात आलं आहे. त्याच मागोमाग वर्धा इथं ४२ पूर्णांक ५ आणि वाशीम इथं  ४२ पूर्णांक ४ अंश सेल्सियस इतका कमळ तापमान नोंदविण्यात आलं. अकोला, यवतमाळ आणि

गडचिरोली इथं तापमान ४१ अंश सेल्सियसच्या घरात आहेत. नागपूर सह उर्वरित जिल्ह्यात तापमान ३७ अंश सेल्सियस ते ४० अंश पर्यंत आहे. वाशीम, अमरावती आणि गोंदिया इथं आज सर्वत्र पावसाचं इशारा असून नागपूरसह अन्य जिल्ह्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडू शकतो.

## कांदा निर्यातबंदी

कांद्यावरची निर्यातबंदी काही प्रमाणात केंद्र सरकारने शिथिल केली आहे. बांगलादेश, संयुक्त अरब अमिरात, भूतान, बहारीन, मॉरिशस आणि श्रीलंका या सहा देशांमधे ९९ हजार १५० मेट्रिक टन कांद्याची निर्यात करायची परवानगी सरकारनं दिली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत २०२३-२४ या वर्षात खरीप आणि रब्बी पिकांचं उत्पादन कमी असल्याच्या अंदाजाच्या तसंच आंतरराष्ट्रीय बाजारात मागणी वाढल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतल्याची माहिती शासनानं जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात दिली आहे.

## आयपीएल क्रिकेट

इंडियन प्रिमियर लीग आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दोन सामने होणार आहेत. दुपारी साडे तीन वाजता दिल्ली कॅपिटल्स आणि मुंबई इंडियन्स संघादरम्यान सामना होणार आहे. तर दुसरा सामना संध्याकाळी साडे सात वाजता लखनौ सुपर जायंट्स आणि राजस्थान रॉयल्स संघादरम्यान होणार आहे.

## दादा परसनाईक

मराठी रंगभूमीवरील प्रख्यात पार्श्वसंगीतकार दादा परसनाईक यांचे आज सकाळी मुंबईत राहत्या घरी झोपेतच  हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ऐंशी वर्षाचे होते. ३०० हून अधिक दूरचित्रवाणी मालिका तसेच १५०० हून अधिक व्यावसायिक नाटकांना

त्यांनी पार्श्वसंगीत दिले. गेली ४५ वर्ष रंगभूमीवर पार्श्वसंगीतकार म्हणून ते अविरत कार्यरत होते. मुंबई दूरदर्शनच्या स्थापनेपासुन ते आजतागायत अनेक मालिका,नाटकं आणि कार्यक्रमांना त्यांनी संगीत दिले होते.

‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’

लोकसभा निवडणुकीचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे.कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण उस्मानाबाद लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात वाजता आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून हा कार्यक्रम प्रसारित होईल.

******